प्रेसनोट

**मोफत बियाणे वाटप कार्यक्रम**

सन 2012-13 व 13-14 मध्ये पीक कर्ज घेतलेल्या व सध्या थकबाकीदार असलेल्या शेतकऱ्यांना विशेष बाबत म्हणुन महाराष्ट्र शासनाने कापुस बियाणे मोफत पुरविण्यासाठी इंडीयन मर्चंटस चेंबर (IMC) मुंबई या कंपनीच्या मदतीने कार्यक्रम ठरवुन अशा प्रकारच्या शासण निर्णय दिनांक 5 जुलै 2016 रोजी निर्गमीत केला आहे.

कंपनी व शासनाच्या सामंजस्य करारानुसार इंडीयन मंर्चंटस चेंबरच्या सभासद कंपन्यांनी त्यांना शक्य आहे तितक्या शेतकऱ्यांना कमाल विक्री किंमतीच्या 50% दराने कापुस व सोयाबीन बियाणे पुरवावयाचे असुन उर्वरीत 50% रक्कम शासन भरणार आहे.

सदरील शासन निर्णयानुसार कापुस उत्पादक प्रमुख 21 जिल्हयातील थकबाकीदार शेतकऱ्यांना प्रत्येकी एक एकर क्षेत्र मर्यादेसाठी प्रत्येकी (2) कापुस बियाण्यांची पाकीट पुरविण्याची मंजुर आहे. प्रत्येक बियाणे पाकीटात 450 ग्रॅम इतके बियाणे उपलब्ध असुन सध्या परभणी जिल्हयासाठी अंदाजे 19000 थकबाकीदार शेतकऱ्यांना कापुस बिंयाण्यांचा पुरवठा करण्यांत येणार आहे.

या योजनेच्या अंमलबजावणीसाठी कृषी विभाग परभणी यांनी कावेरी सिडस कंपनी कडुन कापुस बियाण्यांची पाकीटे उपलब्ध झाले आहेत.

सोयाबीन बीयाण्यांची पाकीटे अद्याप जिल्हयात प्राप्त नसुन लवकरच येण्यांची शक्यता आहे.

तरी सर्व पात्र शेतकऱ्यांनी या योजनेचा लाभ घेण्यासाठी जिल्हा अधिकक्ष कृषी अधिकारी , संबंधीत तालुका कृषी अधिकारी कार्यालये महसुल विभागाची कार्यालये यांचेशी त्वरीत संपर्क साधवा असे आवाहन मा. जिल्हाधिकारी, परभणी यांनी केले आहे.

जिल्हा उपनिबधक
सहकारी संस्था परभणी